GLOCAL COMMUNICATIONS

B/409,Dhamji Shamji Corporate Square,Next to Kanara Business Center,Off Ghatkopar –Andheri Linking Road,Laxmi Nagar,Ghatkopar (E)40075 Phone 7045370433

| Publication | Edition | Date | Page No. |
|---|---|---|---|
| Sakal | Mumbai | 12/09/2017 | Page 02 |

# 'द टार्गेट'ची मराठी आवृत्ती प्रकाशित

मुंबई, ता. ११ : नॅशनल स्पॉट एक्स्चेंज लिमिटेडमध्ये पेमेंट डिफॉल्ट घडवून जिग्नेश शहांचे साम्राज्य उद्ध्वस्त करणाऱ्या षड्यंत्राचा गौप्यस्फोट करणाऱ्या 'द टार्गेट' या पुस्तकाच्या मराठी आवृत्तीचे नुकतेच एका कार्यक्रमात प्रकाशन करण्यात आले. अत्यंत कमी वयात आपल्या बौद्धिक कौशल्याने देश-विदेशांत जिग्नेश शहा यांनी वैश्विक दर्जाची उत्कृष्ट मार्केट्स निर्माण करून भारताला जगाच्या नकाशावर मानाचे स्थान प्राप्त करून दिले. शहांच्या विजयरथाला कुटिल राजकीय कारस्थान व हीन दर्जाच्या षड्यंत्राने कसे उद्ध्वस्त केले, याची पुराव्यासहित तपशीलवार माहिती वरिष्ठ पत्रकार शांतनु गुहा रे यांनी या पुस्तकात मांडली आहे. या पुस्तकाच्या इंग्रजी आवृत्तीने ॲमेझॉनवर केवळ ९० दिवसात विक्रमी विक्री केली. पाठोपाठ आलेल्या गुजराती आवृत्तीची २५ दिवसांत विक्री झाली. 'क्रॉसवर्ड'मध्ये हे पुस्तक बेस्ट सेलर ठरले.



'द टार्गेट'चे प्रकाशन करताना मान्यवर.